# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/06/2023 (शुक्रवार) दुपार

---

## चोरी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा वरोडा तह. कळमेश्वर येथे दिनांक २८/०६/२०२३ चे १७.३० वा. ते दिनांक २९/०६/२०२३ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुरेश डोमाजी खोरगडे, वय ५२ वर्ष रा. वरोडा याचे घर वरोडा येथे दुर्गा मंदीर हायवे रोडवर असुन फिर्यादी हे घरासमोर दोन ट्रॅक्टर उभे करून ठेवत असतात. दि. २८/०६/२०२३ चे सायंकाळी ०५/०० वा. फिर्यादीकडे ट्रॅक्टर चालविणारा ड्रायव्हर नामे— राकेश सदर धुर्वे, रा. वरोडा हा फिर्यादीकडे मजुरीचे कामाने राहतो व ट्रॅक्टर चालविण्याचे काम करतो. दोन्ही ट्रॅक्टर क्रमांक १) ट्रॅक्टर क्र. एम. एच. २९/ सि.—३३९४ २) एम. एच. —४०/एल.—२२७ या ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या काणीतरी अज्ञात चोराने किंमती अंदाजे १२,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार खोपे मो. नं. ९८८१५८२४७१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत नगरपरिषद कळमेश्वर येथे दिनांक २७/०६/२०२३ ते दिनांक २८/०६/२०२३ चे २०/०० वा. ते ०६/०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— सोमेश्वर पंजाबराव पडोळे, वय ५५ वर्ष, रा. खापा यांचे डंपींग यार्ड गोवरी रोड वर पुला जवळ आहे. तेथे रात्री दरम्यान ०४ डंपीग यार्डच्या गाडया व ट्रॅक्टर क्र. एम. एच. ४० डी. जे.—४००१ व डंपीगच्या गाडया १) एम.एच. —४० बी. एल. —०३४८ २) एम. एच.— ४० डी. एल. —०३५० ३) एम. एच.— ४० बी. एल.—०३४७ ४) एम. एच.— ४० डी. एल. —०३४८ च्या बॅटऱ्या दोन्ही दिवशी चोरीला गेले. ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या व डंपीग यार्डचा गाडयाच्या बॅटऱ्या असा एकुण २४,००० /— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१४७८ गायकवाड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर